महाराष्ट्र शासन
प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३१८/प्रनिप्रा/२९ एप्रिल/२०२४/१०१५ दिनांक : 13/5/24

# बैठकीचे इतिवृत्त

**मा. श्री. जे.पी. डांगे (भा.प्र.से.), माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दिनांक २९ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२:०० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **८२व्या** बैठकीचे इतिवृत्त,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, ख्यातनाम शिक्षणतज्ञ, व २) डॉ. एन.एस. उमराणी, व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील ख्यातनाम तज्ज्ञ, ३) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे), ४) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व ५) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य, डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई आणि डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा.यांनी बैठकीच्या अनुपस्थितीबाबत नियमाप्रमाणे रजेचा अर्ज दिलेला नाही त्यानुसार त्यांना अनुपस्थित घोषित करण्यात आले.

तसेच डॉ. अजय चंदनवाले, सह. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, डॉ. हरिभाऊ शिदें, सह संचालक (उ.शि.) उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. वाय.सी. साळे, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे प्रतिनिधी हे निमंत्रित संबंधित संचालकांच्या वतीने प्राधिकरणाच्या बैठकीस उपस्थित होते.

प्राधिकरणाच्या उक्त बैठकीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे आहे,-

**विषय क्रमांक १ : प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २७/०३/२०२४, २८/०३/२०२४ व २९/०३/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७९, ८० व ८१ व्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २७/०३/२०२४, २८/०३/२०२४ व २९/०३/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७९, ८० व ८१व्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले. सर्व संबंधितांनी याबाबत नोंद घेण्यात यावी.

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक २ : प्राधिकरणाच्या क्रमांक ७९, ८० व ८१ व्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २७/०३/२०२४, २८/०३/२०२४ व २९/०३/२०२४ रोजी झालेल्या क्रमांक ७९, ८० व ८१व्या बैठकीच्या इतिवृत्तांनुसार प्राधिकरण कार्यालयाद्वारे करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल खालील प्रमाणे आहे,-

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| बैठक दिनांक : २७/०३/२०२४ | | | |
| १. | १ | प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २७/०३/२०२४, २८/०३/२०२४ व २९/०३/२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत | प्राधिकरणाच्या दिनांक २७/०३/२०२४, २८/०३/२०२४ व २९/०३/२०२४ रोजी झालेल्या ७९, ८० व ८१व्या बैठकीचे इतिवृत्त सर्व संबंधितांना दिनांक १५/०४/२०२४ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |
| २. | ३ | सन २०२४-२५ साठी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे (सीईटी कक्षासह) अर्थसंकल्पीय अदांजपत्रक अवलोकनार्थ व मान्यतेकरिता सादर करणे. | बैठकीत दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करुन सुधारीत प्रस्ताव प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आले आहे. प्राधिकरणाने त्याची नोंद घेतली. |
| ३. | ५(क) | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील स्व.खातिजा कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड), पालघर महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमासाठी प्रवेशित ११ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत. | स्व.खातिजा कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड), पालघर महाविद्यालयातील बी.एड अभ्यासक्रमासाठी प्रवेशित ११ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १९/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबधितांना कळविण्यात आले आहे. |
| ४. | ५(ख) | शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील शहापुर तालुका एज्युकेशन सोसायटीचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शहापुर येथील बी.एड मधील कु.अश्विनी भगवान शिद हिच्या प्रवेश मान्यतेबाबत. | शहापुर तालुका एज्युकेशन सोसायटीचे, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शहापुर येथील बी.एड मधील कु.अश्विनी भगवान शिद हिच्या प्रवेश मान्यतेबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १९/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे. |
| ५. | ५(ग) | श्री. छत्रपती राजे संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव येथील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी. | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील श्री. छत्रपती राजे संभाजी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, जळगाव येथील व्यावसायिक बी.एड. अभ्यासक्रमास प्रवेशित ०२ विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक १९/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| | | बैठक दिनांक : २८/०३/२०२४ | |
| ६. | २(क) | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील एम.आय.एम.एस.आर. चे वैद्यकीय महाविद्यालय, लातुर येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशित डॉ. निखिल नंदवानी या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत. | शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील एम.आय.एम.एस.आर. चे वैद्यकीय महाविद्यालय, लातुर येथील व्यावसायिक पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशित डॉ. निखिल नंदवानी या विद्यार्थ्याच्या प्रवेशा मान्यतेबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे. |
| ७. | २(ग) | मा.प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३०/११/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७(घ) मधील निर्देशानुसार संबंधित संचालकांनी सादर केलेल्या फेर पडताळणी अहवालानुसार प्रवेश मान्यतेबाबत अर्जनिहाय प्रकरणे निर्णयाकरिता सादर. | प्राधिकरणाच्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना प्राधिकरणाच्या दिनांक १९/०४/२०२४, २३/०४/२०२४, २४/०४/२०२५ व २५/०४/२०२४ रोजीच्या महाविद्यालय-निहाय विद्यार्थ्याच्या प्रवेशा मान्यतेबाबत स्वतंत्र पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. |
| ८. | २(घ) | श्री. आयुर्वेद महाविद्यालय व पक्वासा रुग्णालय, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. गायत्री संजय येवते यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी. | श्री. आयुर्वेद महाविद्यालय व पक्वासा रुग्णालय, नागपुर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. गायत्री संजय येवते यांच्या प्रवेश अमान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २४/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे. |
| ९. | २(ङ) | साई आयुर्वेद मेडिकल कॉलेज आणि रिसर्च इन्स्टिटयूट, छत्रपती संभाजीनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दिपक बंडुप्पा परदेशी यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी. | साई आयुर्वेद मेडिकल कॉलेज आणि रिसर्च इन्स्टिटयूट, छत्रपती संभाजीनगर येथील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी आयुर्वेद अभ्यासक्रमास प्रवेशित कु. दिपक बंडुप्पा परदेशी यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २२/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संबंधितांना कळविण्यात आले आहे. |
| | | बैठक दिनांक : २९/०३/२०२४ | |
| १०. | २(क) | पिल्लाई कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नवी मुंबई या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास CAP द्वारे वाटप करण्यात आलेला श्री. ईशान सुमित पाठारे या विद्यार्थ्याचा प्रवेश ऑनलाईन निश्चित करण्याबाबत. | पिल्लाई कॉलेज ऑफ इंजिनियरींग, नवी मुंबई या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित श्री. ईशान सुमित पाठारे या विद्यार्थ्याच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक १०/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये बैठकीतील निर्देशांच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत संचालनालय, तंत्र शिक्षण, मुंबई व संबंधित महाविद्यालय व विद्यार्थी यांना कळविण्यात आले आहे. |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विषय सूची क्रमांक | बैठकीतील निर्देश | करण्यात आलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| ११. | २(ख) | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण विभागांअंतर्गत MBBS, BDS, PGO, PGP, MASLP & MSPO अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी. | शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक ५/०४/२०२४ रोजीच्या पत्रान्वये संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संबंधित महाविद्यालयास यांना कळविण्यात आले आहे. |

सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्राधिकरण कार्यालयाद्वारे केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेऊन मान्य करण्यात आला.

**विषय क्रमांक ३ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षांकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या परिक्षा शुल्कामध्ये वाढ करण्याबाबत सीईटी कक्षाने सादर केलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.**

मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २७/०३/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ३ मधील निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षांकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून घेण्यात येणाऱ्या परिक्षा शुल्कामध्ये वाढ करण्याबाबत सीईटी कक्षाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने व तद्नुषंगाने सादर केलेल्या दिनाक २८/१२/२०२३ रोजीच्या प्रस्तावावर अनुषंगाने झालेल्या चर्चे मध्ये केलेली वाढ हि समर्थनीय असल्याने प्राधिकरणाच्या बैठकीत मत व्यक्त करण्यात आले.

त्या अनुषंगाने; सामाईक परिक्षा शुल्कात खालील प्रमाणे केलेल्या वाढीस प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

| Sr. No. | Name of Exam | Fees for General | Fees for Reserved | Fees for NRI/OCI/PIO/FN |
|---|---|---|---|---|
| 1. | MAH-MCA-CET | 1000 | 800 | 5000 |
| 2. | MAH - MBA/MMS CET | 1000 | 800 | 5000 |
| 3. | MAH-B.HMCT-CET | 800 | 600 | 5000 |
| 4. | MAH-M.HMCT | 1000 | 800 | 5000 |
| 5. | MAH-M.Arch-CET | 1000 | 800 | 5000 |
| 6. | MHT- CET | 800 | 600 | 5000 |
| 7. | MHT-B.Design-CET | 800 | 600 | 5000 |
| 8. | MAH-B.Ed-M.Ed (3yrs Int. Course) CET | 1000 | 800 | 5000 |

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| Sr. No. | Name of Exam | Fees for General | Fees for Reserved | Fees for NRI/OCI/PIO/FN |
|---|---|---|---|---|
| 9. | MAH-LLB-3Yrs | 800 | 600 | 5000 |
| 10. | MAH-M.P.Ed-CET | 1000 | 800 | 5000 |
| 11. | MAH-LLB-5Yrs (4yrs Int. Course) CET | 800 | 600 | 5000 |
| 12. | MAH-B.P.Ed-CET | 800 | 600 | 5000 |
| 13. | MAH - B.A/B.Sc,B.Ed (4yrs Int. Course) CET | 800 | 600 | 5000 |
| 14. | MAH-M.Ed CET | 1000 | 800 | 5000 |
| 15. | MAH-B.Ed & B.Ed (Elect)-CET | 800 | 600 | 5000 |
| 16. | PGP/PGO/M.Sc.(SLP) (Audio)/ M.Sc P&O CET | 2000 | 2000 | 5000 |
| 17. | MAH-AAC CET | 1700 | 1200 | 10000 |
| 18. | MH-B.Sc. Nursing CET | 800 | 600 | 5000 |

<u>विषय क्रमांक ४ :</u> <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे (PGM; PGD; BPTH.; B.SC. NURSING; BASLP, BOTH.; BP&O AND M.SC. NURSING तसेच प्राधिकरणाच्या दिनांक २७ व २८ मार्च मध्ये झालेल्या क्रमांक ७९ व ८०व्या बैठकीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव).</u>

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम ९(५) मधिल तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रवेश बंद दिनांकानंतर विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई संचालकांच्या तपासणी अहवालासह विहित पध्दतीनुसार वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांबाबत व प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेल्या महाविद्यालयांबाबत अवलोकन करुन खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहे,-

१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम १६ नुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश नियामक प्राधिकरणाचे "प्रक्रिया शुल्क" सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक १४/०९/२०२३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

२) ज्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश संख्या ० (शुन्य) आहे, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाचे प्रक्रिया शुल्क आकारणीबाबत संबंधित संचालक यांनी अभिप्राय सादर करावेत व सदर अभिप्रायाच्या अनुषंगाने सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

३) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तंत्र, उच्च व कला शिक्षण विभागाअंतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये उपसमिती गठित करण्यात आली आहे.

४) शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शिक्षण-२, दिनांक २७/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये शासकीय आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील प्रवेशांकरिता शैक्षणिक वर्ष २०१९-२० व त्यापुढील प्रवेशाची पडताळणी आणि प्रवेश मान्यता प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून घेण्याची आवश्यकता राहणार नाही तसेच क्रमांक एमईडी-१०२०/प्र.क्र.२०/२०/शि-२, दिनांक ९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून महानगरपालिकांच्या महाविद्यालयातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशांना मान्यता देण्याचे अधिकार देखील वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयास प्रदान करण्यात येत आहेत, असे कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरण असा निर्णय घेत आहे की, सद्यस्थितीमध्ये **फक्त शासकीय** (राज्य शासनाची) व महानगरपालिका अखत्यारितीतील महाविद्यालये वगळून इतर सर्व महाविद्यालये/संस्थांना प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०८/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(च) नुसार " प्रक्रिया शुल्क " अदा करणे अनुज्ञेय राहील व तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

५) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १) HILLY AREA, २) PWD, ३) DEFENSE, ४) MKB, ५) ORPHAN व ६) अनिवासी भारतीय (एनआरआय) /संस्था स्तरावरील अनिवासी भारतीय कोटयातील रिक्त जांगावर व ७) व्यवस्थापन संवर्गातून प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांनी सदरील प्रवेशाचा दावा सिद्ध करण्याकरिता आवश्यक / विहित केलेल्या व त्यानुसार सादर केलेल्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी प्राधिकरण स्तरावर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला आहे. या प्रक्रियेसाठी प्राधिकरणाच्या दिनांक ८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये गठित करण्यात आल्यानुसार १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, मा. सदस्य, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई तथा कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई -उपसमिती सदस्य व श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई -उपसमिती समन्वयक यांची उपसमिती गठित करण्यात आलेल्या उपसमितीने तपासणी/छाननी करुन स्वयंस्पष्ट अहवाल ०१ महिन्यामध्ये प्राधिकरणास सादर करावा. तथापि सद्यस्थितीमध्ये सदरील प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत नाही.

६) अधिनियम २०१५ मधील तरतूदींच्या अनुषंगाने संचालकांनी सादर केलेल्या अहवालानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर वैद्यकीय व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी सादर केलेल्या तपासणी/पडताळणी अहवालानुसार ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाहीत व प्राधिकरणाने विहित कलेल्या "प्रक्रिया शुल्काचा" भरणा केलेला आहे. अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला, सदरील संचालनालय/अभ्यासक्रम **(प्रपत्र-अ/महाविद्यालय-निहाय)** प्रवेश मान्य करण्यात येत आहे.

तथापि, ज्या प्रवेशांमध्ये त्रुटी आढळलेल्या आहेत असे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत. या अमान्य प्रवेशा संदर्भात हितसंबंधीत घटक मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority
Maharashtra State

दिनांक ३१/०८/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक २(झ) मधील निर्णयानुसार पुनर्विलोकन याचिका विहित पध्दतीनुसार सादर करु शकतील.

७) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी ज्या महाविद्यालयांचे प्रवेश संस्था स्तरावर राबविण्यात आले आहेत, अशा महाविद्यालयांच्या प्रवेशांबाबत संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी खालील प्रमाणे अभिप्राय सादर केलेले आहेत,-

> "A notice was given by National Medical Commission vide letter no. N-P018/(20)/2023-PGMEB-NMC, dated: 24-07-2023, that all MBBS seats in all medical colleges should be filled online through cap round(s) only. But some admissions were done at the institutional level. Such admissions of the candidates done at the institutional level have not been approved by the National Medical Commission. But candidates have filed a petition regarding the same in Hon'ble High Court of Bombay (WP No. 1498 of 2024, WP No. 13312 of 2023, WP No. 15574 of 2023, WP No. 1499 of 2024, WP No. 30687 of 2023, WP No. 13828 of 2023 & WP No. 15575 of 2023) the outcome of which is still awaited. Hence admission of such candidates is subject to Final outcome of these petitions."

सद्यस्थितीत कु. तन्मय राकेश भुगावकर या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या स्पेशल लिव्ह अपील क्र. २७६१९/२०२३ मध्ये दिलेल्या अंतिरिम आदेशाने प्रवेश सुरु ठेवण्यात आला आहे. त्या अनुषंगाने मा. न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन राहून प्रवेशास संबंधित प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. उर्वरित १४० विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी न्यायालयाचे अंतरिम आदेश नसल्याने सदरचे प्रवेश अमान्य करण्यात येत आहेत.

८) वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्राधिकरण स्तरावर निवडक पध्दतीने करण्यात येणाऱ्या १% प्रवेश पडताळणी प्रक्रियेचा अहवाल प्राधिकरणास अप्राप्त असल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांची मान्यता १ टक्के पडताळणी उपसमितीच्या अहवालाच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तथापि सदरील अहवालानुसार या विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत (पात्र/अपात्र) प्राधिकरण स्तरावर तदनंतर कार्यवाही करण्यात येईल, याबाबत संबंधितांनी नोंद घ्यावी. उपसमितीने यासंदर्भात अहवाल प्राधिकरणास त्वरीत सादर करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहे.

९) प्रस्तूत प्रकरणी वरील परिच्छेद क्रमांक (७) मध्ये नमूद केल्यानुसार १% निवडक पध्दतीने तपासणी / छाननी करण्याकरिता गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरणाच्या उक्त निर्देशानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील ज्या महाविद्यालयातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे **(प्रपत्र-अ)**, अशा महाविद्यालयांना प्राधिकरणाच्या प्रवेश मान्यतेचे पत्र निर्गमित करण्याबाबत मागील वर्षाप्रमाणे (शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार) कार्यवाही करावी.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ज्या महाविद्यालयांनी प्रवेश मान्यतेचे प्रसताव अद्याप सादर केलेले नाही, अशा महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास सद्यस्थितीमध्ये प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात येत आहे. तथापि, संबंधित महाविद्यालयांना प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यास १५ दिवसांची मुदत देण्यात येत असून, यासंदर्भात सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी उचित कार्यवाही करावी.

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority
Maharashtra State

विषय क्रमांक ५: मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.

(क) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या निर्देशानुसार गठित करण्यात आलेल्या उपसमिती सदस्यांना बैठक भत्ता अदा करण्याबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून प्रवेश नियामक प्राधिकरणाद्वारे विविध पध्दतीच्या तसेच विशेष कामाकरिता प्राधिकरणाचे सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली इतर कार्यरत विशेष आमंत्रित सदस्य (उपसमितीतील सदस्य) या उच्च स्तरीय अधिकाऱ्यांची उपसमिती गठित करण्यात येते व अशा सर्व अधिकाऱ्यांना सदरील कामकाजाकरिता प्रति बैठक उपस्थिती भता व प्रवास भत्ता अदा करण्याकरिता श्री. भोसले समितीच्या दिनांक १५/०३/२०२१ रोजीच्या अहवालातील मूद्दा क्रमांक (५) मध्ये खालील प्रमाणे तरतूद करण्यात आली आहे,-

*५) अ) विविध बैठकांसाठी तज्ञ / विशेष आमंत्रित / उपसमितीचे अध्यक्ष / सदस्य (बाहेरील) यांना देण्यात येणारे मानधन रुपये ३,०००/-अधिक प्रवास भत्ता (प्रत्यक्ष प्रवास खर्च - ग्रेड पे प्रमाणे (टॅक्सी किंवा ऑटोचे बीलास अधिन राहुन).*

श्री. भोसले समितीच्या उपरोक्त अहवालानुसार प्रवेश नियामक प्राधिकरणाद्वारे विविध पध्दतीच्या तसेच विशेष कामाकरिता प्राधिकरणाचे सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली इतर कार्यरत विशेष आमंत्रित सदस्य यांच्या गठित करण्यात आलेल्या उपसमितीस रु. ३,०००/- प्रति बैठक उपस्थिती भता अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

(ख) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील प्राधिकरण स्तरावर १ % निवडक पध्दतीने छाननी/पडताळणीबाबत उपसमितीचा अहवाल प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर,-
अ) तंत्र शिक्षण, ब) कृषी शिक्षण, क) कला शिक्षण व ड) उच्च शिक्षण.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी मागील वर्षाप्रमाणे ०१ टक्के प्रवेश मान्यता प्रस्तावांची निवडक पध्दतीने प्रत्यक्ष छाननी व पडताळणी करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ०८/०१/२०२४ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार उपसमिती गठित करण्यात आलेली आहे. त्यानुसार तंत्र शिक्षण, कृषी शिक्षण, कला शिक्षण व उच्च शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी कार्यवाही झालेली असून सदरील उपसमितीने सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली. (प्रपत्र-ब) तसेच या संदर्भात १) डॉ. मुरलीधर गोंविदराव चांदेकर, सदस्य, २) डॉ. एन.एस. उमराणी, सदस्य, ३) श्री. महेन्द्र ब. वारभुवन (भा.प्र.से.), सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई, ४) श्री. एस. के. कविटकर, सहा. कक्ष अधिकारी तथा उप-समिति समन्वयक व ४) श्री. व्ही. बा. भिंगारे, सहा. कक्ष अधिकारी तथा उप-समिती समन्वयक इतर संबंधित सदस्य यांच्या उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे.

बैठकीमध्ये कृषी महाविद्यालयांचा १% अहवाल सादर करतेवेळी डॉ. वाय.सी. साळे, प्राध्यापक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे हे उपस्थित होते. अहवालामधील काही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबाबतच्या त्रुटींबाबत त्यांनी प्राधिकरणास तात्काळ अवगत केले व सदरील विद्यार्थ्यांच्या प्रवेशास

(J. P. Dange)
Chairman
Admissions Regulating Authority,
Maharashtra State

कृषी संचालनालयाने दिलेल्या मान्यतेबाबत आणि प्राधिकरणाच्या उप-समितीने काढलेल्या प्रमाणपत्रांच्या त्रुटीबाबत तात्काळ खुलासा सादर केला.

त्यांनी केलेल्या खुलाशाबाबत प्राधिकरण सदस्यांनी त्यांची प्रशंसा केली व त्यांनी केलेल्या कामाची प्राधिकरणाने नोंद घेत असल्याची मा. अध्यक्षांनी नमुद केले.

(ग) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील कला शिक्षण अभ्यासक्रमास शारिरीक विकलांग संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट व क्राप्ट, पुणे येथील शाररिक विकलांग सवंर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित महाविद्यालयांना तपासणी/छाननी प्रक्रियेस उपस्थित राहण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २२/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये (ईमेलद्वारे) कळविण्यात आले होते, परंतू सदरील महाविद्यालये या प्रक्रियेस अनुपस्थित राहिले असल्याने मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक ३१/०७/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ४(त्र) अन्वये या महाविद्यालयातील शाररिक विकलांग संवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता नाकारण्यात आली आहे.

प्राधिकरणाच्या निर्णयास अनुसरुन सदरील महाविद्यालयांनी अनुक्रमे दिनांक ११/०९/२०२३, २२/०९/२०२३ व १३/०९/२०२३ रोजीच्या पत्राद्वारे दिलगिरी व्यक्त केली असून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील व्यावसायिक कला शिक्षण अभ्यासक्रमास शाररिक विकलांग संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता मिळण्याची विनंती केली आहे.

या संदर्भात प्राधिकरणाच्या दिनांक ७/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई व डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट व क्राप्ट, पुणे येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील कला शिक्षण अभ्यासक्रमास शाररिक विकलांग संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांची तपासणी/छाननी प्रक्रिया दिनांक १२/१२/२०२३ रोजी करण्यात आली. प्रस्तूत प्रकरणी उपसमितीने सादर केलेल्या दिनांक ११/०१/२०२४ रोजीच्या अहवालावर सांगोपांग चर्चा करुन सदरील अहवालानुसार ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाही, अशा प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली <u>(प्रपत्र-क)</u>. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी उचित कार्यवाही करावी.

(घ) <u>शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी व पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास विशेष संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी गठित करण्यात आलेल्या उपसमितीचा दिनांक २०/०३/२०२४ रोजीचा अहवाल.</u>

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास १) PWD, २) DEFENCE, ३) MKB, ४) ORPHAN, ५) अनिवासी भारतीय (एनआरआय) /संस्था स्तरावरील अनिवासी भारतीय कोटयातील रिक्त जांगावर व ६) व्यवस्थापन संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २८/०३/२०२३, २७/०४/२०२३ व ३०/०६/२०२३ रोजीच्या बैठकीतील निर्णयान्वये प्राधिकरणाचे मा. सदस्य डॉ. रविंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली १) डॉ. पी.एम. शिनगारे,

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

माजी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई -सदस्य, २) डॉ. दिपक राऊत, माजी सल्लागार, आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार - सदस्य, व ३) श्री. तुषार यशवंत शिंदे, कक्ष अधिकारी, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई - समन्वयक यांची उपसमिती गठित करण्यात आली आहे.

सदरील विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता नसल्याने त्यांचे परिक्षा अर्ज स्वीकारण्याबाबत / परिक्षेचे निकाल जाहिर करण्याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

सदरील उपसमिती मार्फत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी / पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमास विशेष संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांची तपासणी / छाननी करण्यात आली. याबाबतचा अभ्यासक्रम -निहाय २०/०३/२०२४ रोजीचा अहवाल सादर करण्यात आला. यावर सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्रस्तत प्रकरणी व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी अनिवासी भारतीय (एनआरआय) /संस्था स्तरावरील अनिवासी भारतीय कोटयातील रिक्त जांगावर व व्यवस्थापन संवर्गातून प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी उपसमितीचा प्राथमिक स्तरावरील तपासणी / छाननी अहवालाचा प्राधिकरणाने आढावा घेतला व तद्नुषंगाने त्रुटींची पूर्तता करण्याकरिता आवश्यक कागदपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत निर्देश देण्यात आलेले. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांना कागदपत्रांची पूर्तता करण्याकरिता तथा मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करण्याबाबत कार्यालयाच्या दिनांक १७/११/२०२३, ७/१२/२०२३ व ९/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तथापि, महाविद्यालयांकडून सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची / माहितीची मा अध्यक्ष महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी छाननी करण्यात आली असून सदरील अहवालानुसार ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटी नाही, अशा प्रवेशांना प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली. (प्रपत्र-ड))

प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी विषयाची तातडी लक्षात घेता, बैठकीचे इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता बैठकीमध्ये झालेल्या ठरावानुसार यापुढे कार्यवाही त्वरीत करण्याबाबत निर्देश देण्यात आले. तसेच बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाल्यानंतर प्राधिकरणाच्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील सर्व संबंधीत विभागानी त्यांच्याशी संबंधीत प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्यामार्फत प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या संदर्भात अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व प्रशासकीय अधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई हे दोन्ही विभागातील संबंधीत विभागांना बैठकीचे इतिवृत्त उपलब्ध करुन देतील, याबाबत कृपया नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया करण्याकरिता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे आणि प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी परिपूर्ण माहिती/अहवाल विहित कालावधीमध्ये सादर केलेले आहेत, या त्यांच्या

(जे. पी. डांगे)
अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,

उल्लेखनीय कामाची प्राधिकरण नोंद घेत आहे. बैठकीच्या सरतेशेवटी सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(जे.पी. डांगे) भा.प्र.से.
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

दिनांक : 13/5/24